**विभागीय आयुक्त कार्यालय,**
**नागपूर विभाग, नागपूर**

निविदा क्र १/एम यु एन १९(२)/ १०(०९) /०९
नागपूर दिनांक १२ नोव्हेंबर, २००९

**//जाहीर निविदा सूचना //**

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ७९, १२२ व १२६ महाराष्ट्र जमीन महसूल (गांव/शहर व नगर भुमापन) सुधारणा नियम, १९६९ च्या नियम ४ मध्ये दिनांक ६.१०.२००० च्या अधिसूचने अन्वये दाखल करण्यात आलेल्या परंतुका नुसार तसेच महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -१००६/प्र.क्र.३०१/ल-१, दिनांक १६ ऑगस्ट, २००८ अन्वये नागपूर विभागातील खालील दर्शविलेल्या नगरपरिषदांच्या क्षेत्रातील महसूली गावांचे नगर भुमापन करविण्याचे ठरविले आहे. सदर कामासाठी भूकर सर्व्हेक्षणाचा अनुभव असलेल्या संस्थेकडून २ लिफाफा पध्दतीत मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

**:निविदेबाबत :-**

| अ.क्र. | नगरपरिषदा | वर्ग | निविदा प्रतीची किंमत रुपये प्रति निविदा | इसारा रक्कम रुपये प्रति नगरपरिषद | निविदा उघडण्याचा दिनांक आणि वेळ | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | खापा, जि.नागपूर | क | २०००/- | २५०००/- | दिनांक ७.१२.२००९ वेळ दुपारी ४.०० वाजता | ८ महिने |
| २ | मोवाड, जि.नागपूर | क | २०००/- | २५०००/- | | |
| ३ | मोहपा, जि.नागपूर | क | २०००/- | २५०००/- | | |
| ४ | तिरोडा,जि.गोंदिया | क | २०००/- | २५०००/- | | |
| ५ | सिंदी (रे) जि.वर्धा | क | २०००/- | २५०००/- | | |
| ६ | राजुरा, जि.चंद्रपूर | क | २०००/- | २५०००/- | | |

वरील कामाकरीता कोरे निविदा फॉर्म, संबंधित मुख्याधिकारी नगरपरिषद यांचे कार्यालयात व विभागीय आयुक्त कार्यालय तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, यांचे कार्यालय, जुने सचिवालय, सिव्हील लाईन, नागपूर ४४० ००१ (खोली क्र १३) येथे दिनांक १६.११.२००९ ते दिनांक ३०.११.२००९ दरम्यान कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.३० ते दुपारी २.०० या वेळेत पुढील कागदपत्रे सादर केल्यास रोख रक्कम भरुन मिळतील.

अ) मागील तीन वर्षापैकी किमान एका वर्षात रु.२० लक्ष पेक्षा जास्त किंमतीचे अथवा कमीतकमी २५.०० चौरस किलोमिटर क्षेत्राचे शासनाकडील वा निमशासकीय संस्थेकडे सर्व्हेक्षणाचे काम केल्याचा दाखला.

ब) प्राप्तीकर विभागाकडील अलीकडचे ना थकबाकी प्रमाणपत्र.

क) बँकेकडील किमान रु. ३० लक्ष एवढया रकमेचे पतदारी प्रमाणपत्र.

ड) तांत्रिक कर्मचारी वर्गाची यादी व भूकर सर्व्हेक्षण अनुषंगिक अत्याधुनिक यंत्र सामुग्रीची यादी.

उपरोक्त कागदपत्रांच्या तपासणी नंतर प्रथमदर्शनी पात्र आढळून येणा-या संस्थांना निविदेची किंमत (नापरतावा) भरल्यास कोरे निविदा अर्ज देण्यात येतील. निविदा कागदपत्र टपालाने पाठविल्या जाणार नाहीत.

तसेच मंजुर निविदा धारकांना निविदेमध्ये नमुद केल्याप्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम भरणे आवश्यक राहील

उपरोक्त इसारा रक्कम केवळ राष्ट्रीयकृत बँकेचे डिमांड ड्राप-टने Accounts Officer, Divisional Commissioner Office, Nagpur Division, Nagpur यांचे नावे निविदा सोबत भरण्यात यावी. मोहरबंद निविदा दिनांक ७.१२.२००९ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत निम्नस्वाक्षरीकार यांचे कार्यालयात स्विकारण्यात येतील व प्राप्त निविदा त्याच दिवशी दिनांक ७.१२.२००९ रोजी दुपारी ४.०० वाजता उपस्थित निविदाकारा समक्ष उघडण्यात येतील.

देकारपूर्व सभा दि. १.१२.२००९ रोजी दुपारी ४.०० वाजता विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर , यांचे कार्यालय, जुने सचिवालय, सिव्हील लाईन, नागपूर ४४० ००१ येथे आयोजित केलेली आहे. ज्यांनी निविदा खरेदी केलेली आहे अशांच्या केवळ दोन प्रतिनिधीनांच या सभेत उपस्थित राहता येईल. देकारपूर्व सभा ही फक्त निविदेत समाविष्ट असलेल्या अटी आणि शर्तीच्या शंका निरसनासाठी/स्पष्टीकरणाकरिता असेल आणि त्यामध्ये सूचित केलेल्या कोणत्याही सुधारणाची/बदलाची दखल घेतली जाणार नाही.

कोणतेही कारण न देता कोणतीही वा सर्व निविदा नाकारण्याचे अथवा विविध संस्थांना कार्य/कामे भागशः वाटून देण्याचे अधिकार विभागीय आयुक्त नागपूर विभाग, नागपूर हे राखून ठेवत आहे.

संबधीत जाहीर निविदा सूचना http://nagpur.nic.in/divisional commissioner/index.htm या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

विभागीय आयुक्त,
नागपूर विभाग, नागपूर